RNI No: MAHMAR/2004/13776 ✸ Postal Registration No: MH / MR / NW-35 / 2014-2016
Published On:12 May 2015 ✸ Posted at Kandivli(W) Post Office, Mumbai on 14 May, 2015

अजायब ✵ बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : बारा | अंक : अकरा | मे २०१५

अमृतवेळ (ध्यान-अभ्यासा विषयी संदेश) 4

परमार्थ (सत्संग) 5

हरीचे नाम (सत्संग) 27

धन्य अजायब (सत्संगाच्या कार्यक्रमांची माहीती) 34

मालक, मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व संपादक श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई - 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई - 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.

अमृतवेळ

परम संत अजायब सिंह महाराजांनी ध्यान-अभ्यासाच्या कार्यक्रमा प्रारंभी संगतला दिलेला संदेश, मुंबई - २३ जानेवारी १९८१



आपणांस माहित आहे कि आपण सर्वजण येथे का एकत्रित झालो आहोत. ही अमृत वेळ आहे. या अमृत वेळी पक्षी देखील जागृत होतात आणि त्यांच्या जन्मदात्याप्रती आभार व्यक्त करतात. फरीद साहेब सांगतात:

हौं बलिहारी पंखियां जंगल जिन्हां वास।
कंकर चुगन थल वसन रब न छड्डन पास।।

आपण सांगता मी त्या पक्षांवर स्वत:चे बलिदान देतो कारण ते पहाटे उठून सर्वप्रथम परमात्म्याचे आभार मानतात. गुरु नानक देवजी ही सांगतात:

चिड़ी चुकी पो फुटी वगन बहुत तरंग।
अचरज रूप संतन रचे नानक नामे रंग।।

पक्षी पहाटे त्यांच्या बोलीत परमात्म्याचे आभार मानतात. जे महान आत्मा या संसार मंडळावर आलेले असतात, ते या अमृतवेळी निद्रावस्थेत नसून नाम जपण्यात समरस झालेले असतात.

परमात्म्याने आपल्यावर प्रचंड कृपा केली असून त्याने त्याच्या प्राप्तीचा मार्ग दाखवून आपणांस त्याच्या नामाशी जोडले आहे.

***

परमार्थ

सत्संग: परमसंत अजायब सिंहजी महाराज, महात्मा मीराबाईंची वाणी
सन्त बानी आश्रम, १६ पी एस, राजस्थान, – ७ फेब्रुवारी १९९३

कहो नानक प्रभ एहे जनाई बिन गुरु मुक्ति न पाईऐ भाई।

बंधुनो! परमात्मा जेव्हा आत्म्यांना स्वत:शी भेटवू इच्छितो, तेव्हा तो आम्हा जीवांसाठी मनुष्य देह धारण करून जरूर या जगामध्ये येतो, कारण आपला आत्मा परमात्म्याचा अंश आहे. एका अंशाचे दुसऱ्या अंशावर निसर्गत:च प्रेम असते. देव–देवतांना आपण पाहिलेले नसते. गाय, म्हैस, घोडे यांसारख्या जनावरांची भाषा आपण समजू शकत नाही. म्हणूनच परमात्मा आपली दया करून आपले खरे घर सचखण्ड, जो शांतीचा देश आहे, जिथे जन्म–मृत्यु नाही, असा देश सोडून मनुष्यजन्म धारण करून या जगात आम्हा जीवांसाठी येतो. कबीर साहेब सांगतात:

महरम होय सो जाने साधो ऐसा देश हमारा।

जर कोणी सच्चखण्डामध्ये जात असला तर केवळ त्यासच त्या देशाबद्दलचे ज्ञान असू शकते. गुरु रविदासजी सांगतात:

बेगमपुरा शहर का नांव दुख अंधेरा नहीं तह ठांव।

आपण सांगता की ज्या शहराचे आम्ही वासी आहोत, ते शहर तेजोमय व प्रकाशमान आहे. अशा शहरास त्यागून परमात्मा आम्हा जीवांच्या उद्धारासाठी मनुष्य जन्म धारण करून या संसारात येतो. दिसायला तर तो एखाद्या सामान्य मनुष्याप्रमाणेच दिसतो, यामध्ये तर काही शंकाच नाही. ज्याप्रमाणे एक मनुष्य शिकला–सवरलेला असतो तर दुसरा निरक्षर असतो, एक मनुष्य अपराधी असतो तर दुसरा न्यायाधीश असून न्यायखुर्चीत बसून तो अपराध्यास शिक्षेची सुनावणी करतो. दिसायला तर ते दोघेही मनुष्यच दिसतात, परंतु त्यांच्या पात्रतेमध्ये व ज्ञानामध्ये खूपच तफावत असते.

मौलाना रूम यांनी अतिशय प्रेमाने सांगितले आहे की, उर्दू भाषेत शेर आणि क्षीर हे शब्द एकाच पद्धतीने लिहिले जातात, परंतु त्या दोन शब्दांच्या अर्थांमध्ये जमीन-अस्मानाचा फरक आहे. क्षीर शब्दाचा अर्थ दुध असा होतो, ज्यामुळे आपणांस शक्ती लाभते आणि शेर म्हणजे वाघ. हा हिंस्त्र प्राणी आहे जो जीवांची चिरफाड करून खातो. जसे हे दोन्ही शब्द लिहिण्यात काही फरक नसतो, परंतु त्यांच्या अर्थात खूप फरक आहे, तसेच संत व मनुष्यात फरक दिसून येत नाही, परंतु त्यांत खूप फरक असतो.

त्या शांतीच्या समुद्रात आपल्या आत्म्यांप्रती दया जागृत झाली व ते या संसारात आले. खरेतर सतगुरु संसारात प्रथमच आलेले नाहीत, ते सदैव या संसारात येत राहिले आहेत. ज्यांच्या आठवणीत आपण बसलो आहोत, त्या गुरुंच्या चरणी मी नमस्कार करतो, ज्यांनी येऊन या गरीब आत्म्यावर कृपेचा वर्षाव केला. काल महाराज कृपालजींचा ६ फेब्रुवारी रोजी जन्मदिवस होता. खरेतर संत परोपकारी असतात, ते जन्म-मरणाच्या दु:खापलिकडे पोहचलेले असतात. तरीदेखील संसारिक दृष्टिकोनातून आपण त्या दिवसाचे महत्व जाणून त्यांचा जन्मदिवस साजरा करतो.

सिद्धांनी एकदा गुरु नानकदेवजींना प्रश्न विचारले की आपला जन्म कधी व कुठे झाला? आपले आई-वडिल कोण आहेत? आपण कुठले निवासी आहात? या प्रश्नांची उत्तरे देताना ते सिद्धांना सांगू लागले:

सतगुरु के जन्में गवन मिटाया, अनहद राते ऐह मन लाया।

सतगुरुंनी कृपा-वर्षाव केला, त्यांच्याद्वारे मला नाम लाभले. त्यामुळे सतगुरुंच्या घरी माझा जन्म झाला. त्यांनी मला शब्दनामाचे रहस्य सांगितले, नामदान दिले. त्यामुळे आता रात्रं-दिवस माझे ध्यान शब्दाशी एकरूप झाले आहे. ज्या दिवशी आपली भेट आपल्या महान परमात्मारूपी सतगुरुंशी होते, तोच आपला खरा जन्मदिवस असतो.

असे आदरणीय, महान सतगुरु सदैव या जगात येत असतात. जर ते या संसारात आले नसते तर आपल्यासारख्या मार्गावरून भटकलेल्या जीवांना काय कळले असते? परंतु असे महान आत्मा जेवढ्या प्रेमाचे अधिकारी असतात, तेवढे प्रेम त्यांना या संसारी लोकांपासून मिळत नाही, तसेच त्यांच्यावर प्रेम कसे करावे, हे आपण जाणतही नाही. आपण अंध असून ते दृष्टिवान आहेत. अंध लोकांना दृष्टिवान लोकांबद्दलचे काय ज्ञान असते?

गुरु नानकदेवजींना त्याकाळचे लोक कुराहिया (पथभ्रष्ट) असे म्हणून हिणवत असत व त्यांना गावात येऊ देत नसत कि हे लोकांची बुद्धी भ्रष्ट करतात. गुरु नानकदेवजींच्या जीवनचरित्रात त्याकाळच्या चरित्रलेखकांनी अशी नोंद केलेली आहे की, कसूर प्रांतात गुरु नानकदेवजींना गावात प्रवेश करू दिला नाही, त्यामुळे त्यांनी गावाबाहेर राहत असलेल्या एका कुष्ठरोग्याच्या झोपडीत रात्र काढली. त्या कुष्ठरोग्याचा रोग बरा झाला.

गुरु नानकदेवजींनी दहा जन्म घेतले कि जेणेकरून एक नव्हे तर दुसऱ्या जन्मामध्ये तरी लोक त्यांना ओळखतील. परंतु जेव्हा कधी ते या संसारात आले, तेव्हा कोणीही त्यांना शांतपणे बसू दिले नाही, त्यांच्यापासून जो काही फायदा करून घ्यावयास हवा होता, तो फायदा करून घेतला नाही. आपणां सर्वसाधारण जीवांची अशी अवस्था असते कि ज्यावेळी असे महापुरूष जगात येतात तेव्हा आपण इतरत्र आशा-अपेक्षा ठेवून बसलेलो असतो व त्यांच्याकडून अध्यात्मिक फायदा घेत नाही. आत्ताच प्रेमीने भजन म्हटले:

कहो नानक प्रभ एहे जनाई बिन गुरु मुक्ति न पाईऐ भाई।

सत्य लपविण्याचा कितीही प्रयत्न केला, तरी ते लपत नाही, शेवटी त्यावर प्रकाश पडतोच. या जगात जर आपणांस कोणतेही काम, कितीही लहानातले-लहान काम, उदाहरणार्थ शेती, लोहार काम, सुतार काम वा कुंभार काम तसेच लिहिण्या-वाचण्याचे वा इतर कसलेही काम शिकावयाचे

असल्यास आपणांस त्या कामामधील तज्ज्ञाकडे जाऊन ते शिकावे लागते. आपण जर या जगातील काम एखाद्या तज्ज्ञाशिवाय शिकू शिकत नाही तर अध्यात्मिक काम जे आहे, अंतर्यात जाऊन परमात्म्यास भेटण्याचा जो विषय आहे, तो अतिशय गुंतागुंतीचा आहे, ती गुंतागुंत आपण एखाद्या तज्ज्ञ शिक्षकाशिवाय कशी बरे सोडवू शकू?

सर्व महात्म्यांनी असेच म्हटले आहे की परमात्मा बाह्यजगातील जंगल, पर्वत वा मुर्त्यांमध्ये नसून, जर त्याचे अस्तित्व आहे तर ते तुमच्या अंतर्यात आहे. सर्व महात्म्यांनी हाच संदेश दिला कि जर का असली मंदिर, ठाकूरद्वारा, गुरुद्वारा, मस्जिद किंवा चर्च असेल तर ते आपले शरीरच आहे.

आपणांस हे सुद्धा ज्ञान नाही कि आपण दररोज ग्रहण करीत असलेले अन्न आपल्या घशाखाली शरीराच्या कोणत्या भागात जाते, तरमग आपण स्वत:हून अंतर्यात जाऊन परमात्म्याचा शोध कसा बरे घेऊ शकू? त्यामुळे आपण बहिर्मुख होतो. बाहेर शोध घेऊन आजपर्यंत ना कोणाला परमात्मा भेटला आहे, ना भेटू शकतो. प्रत्येक महात्म्याने आपणांस हेच सांगितले आहे की, परमात्म्यास भेटावयाचे असल्यास सर्वप्रथम तुम्ही परमार्थाचा अभ्यास केलेल्या जाणकार व्यक्तीकडे जावे, त्या व्यक्तीस तुम्ही संत म्हणा वा त्यांच्या आई–वडिलांनी ठेवलेल्या नावाने त्यांना हाक मारा. ते कधीही तुमचे गुरु वा पीर असल्याचा दावा करीत नाहीत. ते सांगतात, अगोदर तुम्ही अंतर्यात जाऊन स्वत:च्या डोळ्यांनी सत्य पहा आणि मग तुम्हांस हवं ते तुम्ही बोला! त्यामुळे तुम्ही कोणत्याही महात्म्यांची वाणी वाचून पहा, सर्वांचा एकच संदेश आहे.

मी सहजोबाईंच्या वाणीवर अनेक सत्संग केलेले आहेत. साधारणत: गुरु नानकदेवजी, रविदासजी, कबीर साहेबजी, महात्मा चरण दासजी आणि इतर अनेक परमगती प्राप्त झालेल्या, शरीर सोडून ब्रह्मांडाची चढाई केलेल्या व परमात्म्याची प्राप्ती केलेल्या संतांच्या वाणीवर सत्संग केले जातात.

जेव्हा गुरु अर्जुनदेवजी महाराजांनी गुरु ग्रंथ साहेब या ग्रंथाचे संकलन केले, तेव्हा कोणत्याही जातीला महत्त्व न देता अंतर्यामधील लक्ष्य प्राप्तीला महत्त्व दिले. महात्मा भलेही मुसलमान वा हिंदू अशा कोणत्याही जातीतील असोत, फरीद साहेब, कबीर साहेब, भीखनशाह हे सर्व संत मुसलमान घराण्यांमध्ये जन्मास आलेले होते, तरी या सर्वांच्या वाणींना गुरु अर्जुनदेवजींनी त्यांच्या गुरुग्रंथ साहेबमध्ये विशाल हृदयाने समाविष्ट केले आहे.

संत कधीही नवीन जात बनविण्यासाठी वा अगोदर अस्तित्वात असलेली जात भंग करण्यासाठी येत नाहीत. ते तर आपल्याद्वारे परमात्म्याची भक्ती करवून, परमात्म्यास प्राप्त करवून देण्यासाठी येतात. ते आपणांस सांगतात आपण आपल्या जातीतच राहा, आप–आपली भाषा बोला, आपल्या रिती–रिवाजानुसार विवाह वगैर करीत रहा, महत्त्वाचे हे आहे की गृहस्थाश्रमातील जबाबदाऱ्या पार पाडीत असताना स्वतःच्या आत्मोन्नतीसाठी देखील काही तरी जमापुंजी गोळा करा.

या जगात आपले कोण आहे? मृत्यू आल्यावर आपण आपल्या नेत्रांनी पाहतो कि आई–वडिल, बहिण–भाऊ, मित्र–मंडळी कोणीही त्यावेळी आपली साथ देत नाहीत, आपली सत्ता देखील आपल्या मदतीस येत नाही. घरातील लोकांना यागोष्टीची कल्पना देखील नसते की यमदूत कोठून आला व त्याने आत्म्यास कान पकडून कोणत्या मार्गाने नेले? अशावेळी रूदन–विलापाशिवाय ते आणखीन काय आपली मदत करतील? कबीर साहेब सांगतात:

आसी पासी योद्धा खड़े सभी बजावें गाल।
मंज महल्लो लै गया ऐसा काल कराल।।

मी नेहमी सांगतो की मला झोपडीवासीपासून त्या काळच्या राजापर्यंतच्या सर्वप्रकारच्या लोकांना भेटण्याची संधी मिळाली आहे. एक–दोन राजांचा मी नेहमी उल्लेख करतो, ज्यांच्या सैन्यात मी नोकरीदेखील केली. त्यांच्या अंतसमयी केली गेलेली कडक व्यवस्था मी पाहिली आहे. तेथे पहाऱ्यासाठी

पहारेकरी उभे केले गेले. परंतु कोणत्याही पहारेकऱ्यास हे समजले नाही की यमदूत राजास घेऊन कोठे गेला? प्रेमींनो, ज्यांना हे समजले नाही, ते काय मदत करू शकणार? गुरु नानकदेवजी सांगतात:

सज्जन से ही आखिए जो चलदयां नाल चल्लन।
जित्थे लेखा मंगिए तित्थे खड़े दस्सन।।

सर्वांत कष्टदायक घटका मृत्यूसमय असतो, ज्यावेळी सर्वजण आपली साथ सोडतात, त्यावेळी जे आपणांस साथ देतात, तेच खरे सज्जन अर्थात सच्चे साथी असतात. त्यावेळी आई-वडिल, बहिण-भाऊ, मित्र-मंडळी साथ देत नाहीत, आपल्या कामी येत नाहीत. मी सहजोबाईंच्या सत्संगामध्ये सांगितले होते की त्यावेळी घरातील लोक कोणत्याप्रकारची सहानुभूती दर्शवितात? ते म्हणतात, तू मरण्याअगोदर कोठे काही (धन-संपत्ती वगैरे) ठेवले असल्यास ते सांग, नंतरच तू मर. तुम्हीच पहा! त्याचा जीव जात असतो, तर आपण त्यास कागदावर सही करण्यास सांगत असतो. आपण त्यास काय मदत करणार? आपण सर्वजण आपल्या स्वार्थपूर्तीसाठी, गरजा भागविण्यासाठीच एकमेकांसोबत जुडलेलो आहोत. जर नि:स्वार्थ प्रेम कोणाचे असेल तर ते त्या महात्म्यांचे असते, ज्यांनी आपणांस नाम दिलेले असते.

आज आपणांसमोर मीराबाईंची वाणी सादर करीत आहे, ती अतिशय लक्षपूर्वक ऐकण्यासारखी आहे. मीराबाई राजपूत घराण्यामधील मेडता परिवारामध्ये जन्मास आली होती. मीराबाई राजा रतनसिंहची मुलगी आणि राव दूदाची नात होती. रतन सिंह रावदूदाचा कनिष्ठ पुत्र होता. कनिष्ठ मुलास राजगादीचा अधिकार मिळत नसे, केवळ उदरनिर्वाहासाठी त्यास एखादे गाव किंवा भत्ता वगैरे मिळत असे. मीराबाई दोन वर्षांची असताना तिची आई निधन पावली. मीराबाईंचे आजोबा, राव दूदा यांचे मीराबाईंवर खूप प्रेम होते. त्यांना त्यांची नात आपल्या प्राणापेक्षा प्रिय होती. त्यांनी मीराबाईस स्वत:च्या राजमहालामध्ये आणले. तेथेच तिचे पालनपोषण झाले. राव दूदा शूर योद्धा

होते तसेच ते धार्मिकही होते. त्यांच्या हृदयात परमात्म्यासाठी उच्च स्थान होते, त्यामुळे त्यांच्या राजमहालामध्ये पंडित, संन्यासी आणि साधू मंडळींचा वावर असे. त्यामुळे मीराला त्यांची संगत करण्याची संधी लाभली.

त्यावेळच्या राजांच्या रितीरिवाजानुसार मीराबाईस सर्वप्रकारच्या शस्त्र–विद्या, शास्त्र–विद्या, तिरंदाजी, घोडस्वारी वगैरेंचे प्रशिक्षण देण्यात आले. शस्त्र–विद्येने तिच्या अंतर्यात निर्भयता, दृढनिश्चयीपणा आणि धाडस निर्माण केले तर वेद–पुराणांच्या शिक्षणाने तिच्या अंतर्यात भक्तीभाव निर्माण केला. ती नेहमी कोमल चित्ताने तसेच मन–मोहक वाणीने बोलत असे.

मीराबाई जेवढी गुणवान होती, सोबत तेवढीच सौंदर्यवानही होती. परमात्म्याने तिला अतिशय सुंदर रूप दिले होते. मेडता प्रांताचा राजा सांगा याने मीराबाईच्या सर्वगुणसंपन्नते विषयी ऐकले होते कि ती शास्त्रविद्येत निपुण, खूप शिकलेली व धाडसी आहे तसेच तिचे रूप देखील खूप सुरेख आहे. त्याने विचार केला की आपल्या प्रिय राजकुमारासोबत विवाहासाठी तिची मागणी करावी, जेणेकरून भविष्यामध्ये आपल्या राज्याची महाराणी तिने बनावे. राणा सांगाने विवाहासाठी राव दूदाच्या नातीचा हात मागितला असता, राव दूदाने अत्यानंदाने तो लग्नप्रस्ताव स्वीकारला.

ज्यावेळी या राजघराण्यांचा नातेसंबंध झाला, त्यावेळी ही दोन्ही राज्ये स्वतंत्र आणि बलाढ्य राज्ये होती. त्यानंतर राव दूदा अधिक काळ जगात राहिला नाही. त्याच्या मृत्यूचा मीराबाईस गंभीर धक्का बसला. त्यानंतर तिचा काका वीरम सिंह राजगादीवर बसला. त्याने मीराबाईचा विवाह मोठ्या थाटामाटात करून दिला. मेवाड व मेडता, दोन्ही प्रांतांना एखाद्या नववधुसमान सजविले गेले. त्याकाळच्या हिंदुस्थानी रितीरिवाजानुसार दान–हुंडा दिला गेला. मीराबाईचा सासरा राणा सांगाने अतिशय विशाल हृदयाने त्याच्या ज्येष्ठ पुत्र भोजराजाशी मीराचा विवाह रचून, तिला घेऊन गेला. भविष्यात मीराने त्याच्या राज्याची महाराणी बनावे अशी त्याची इच्छा होती.

मीराच्या काकाचेही त्याच्या पुतणीवर खूप प्रेम होते. मीराप्रती त्याच्या हृदयामध्ये खूप मान होता. त्याने मीराला भरपूर हुंडा–दान देऊन आपला आनंद साजरा केला. राणा सांगानेही खूप मोठी जहागीर त्याच्या सुनेच्या नावे केली. इतिहासामध्ये नोंद आहे की जी काही जमीन मीराबाईस मिळाली, ती सर्व जमीन तिने गोरगरीबांमध्ये वाटून टाकली.

तरीही सासरी तसेच माहेरी, दोन्ही ठिकाणी तीचा खूप आदर केला जाई. मीराच्या पतीच्या हृदयामध्ये मीरा प्रती अथांग प्रेम होते. हे जग जन्म–मृत्यूचे ठिकाण असून, केवळ देण्या–घेण्याच्या संबंधांची पूर्ती करण्यासाठी आपण येथे येत असतो. मीराचे वैवाहिक जीवन खूप काळ टिकले नाही. काही काळाने तिच्या पतीचे निधन झाले. याचा तिच्या हृदयावर खूप मोठा आघात झाला, तिच्या जीवनात उदासी निर्माण झाली कि हा संसार तर जन्म–मृत्युचा आहे. जीवनामध्ये अशा अनेक घटना घडतात, ज्या आपणांस हादरवून टाकतात. त्या घटनांमुळे निर्मळ आत्म्यांमध्ये सुप्तावस्तेत असलेल्या भक्तीच्या बीजाला कोंब फुटतात. मीराच्या बाबतीत असेच घडले.

सुरूवातीला मीराबाई भगवान कृष्णाची उपासक होती. तिची एवढी गहन भक्ती होती की ती कृष्णाचेच रूप बनून गेली होती. आमचे सतगुरु महाराज कृपाल नेहमीच सांगत असत,''भुकेलेल्यास भाकरी व तहानलेल्यास पाणी मिळणे हा निसर्गाचा नियमच आहे व ते त्यांना नक्कीच मिळते.'' तिची मनोभावे केलेली भक्ती व तिचे परमात्म्याप्रती प्रेम पाहून परमसंत आले.

खरे परमसंत ज्याठिकाणावरून येतात, तिथपर्यंत अवतार पोहचू शकत नाहीत. अवतार ब्रह्मस्थानातून येतात, ते स्वत:च या जगामध्ये येणे–जाणे, जन्म–मृत्यूच्या चक्रात अडकलेले असतात. गुरु नानकदेवजी सांगतात:

कृष्ण सदा अवतारी रुदो कित लग तरे संसारा।

जो स्वत:च जन्म–मृत्यूच्या जगामध्ये अडकलेला आहे, तो इतरांना कसे बरे पार करू शकेल? मी महाराज सावन सिंहजींचे उदाहरण नेहमी

देतो. ते सांगत असत, सुख–दु:ख, श्रीमंती–गरीबी, आजारपण–सुदृढपणा, सतगुरुंची भेट, नामाची प्राप्ती, सतगुरुंवर विश्वास बसेल कि नाही, या सर्व गोष्टी अगोदरपासूनच सुनिश्चित झालेले असते. सुनिश्चित वेळी घटना घडतात. परंतु जीव लाचार असल्याने त्यास याचे ज्ञान नसते. मीराच्या आयुष्यामध्ये देखील अशीच घटना घडली. त्या वेळी आत्म्यांना सच्चखण्डामध्ये नेण्याची जबाबदारी गुरु रविदासजींवर सोपविलेली होती. ते अंतर्यामी होते, प्रत्येकाचे अंतरमन ओळखत होते. ते स्वत: चितौडला गेले.

त्याकाळी सर्वसाधारणपणे राजांच्या राज्यांमध्ये स्पृश्य–अस्पृश्यतेचे खूप स्तोम माजलेले होते. मेवाड प्रांतातच नव्हे तर पंजाबमधील संस्थानांत देखील अस्पृश्यांचे व गरीबांचे वस्तीस्थान गावाबाहेर असे. आपण आजही पाहतो की, त्यांची संख्या अधिक असल्याने घरांची अंगणे एकमेकांस जोडली गेलेली आहेत, परंतु त्याकाळी यालोकांना गावाच्या कोपऱ्यात थोडे दूरच ठेवले जाई,जेणे करून त्यांना ना पूर्वेकडून ना पश्चिमेकडून हवा मिळावी.

ज्या जाती–जमातीची आपल्याद्वारे इतकी अवहेलना व निरादरी होत असेल, त्या जातीमध्ये जर परमात्मारूपी संत जन्मास आले तर एखाद्या राजपूत महाराणीसाठी त्यांना सतगुरु मानणे कठीण असते. परंतु मीराबाईसाठी हे काही अवघड नव्हते. मीराबाई सांगतात:

धुर की कलम भिड़ी।

मीराबाई सांगतात माझी अंतर्यात परमात्म्याची लेखणी जुळली आहे. परंतु आपण सामाजिक लोकांना अशा गोष्टी मानवत नाहीत. तेव्हा मीराचा दीर राजगादीवर स्थानापन्न होता. सामाजिक लोकांनी त्याचे कान भरले की मीरा चांभार जातीच्या रविदासांकडे जाते व त्यांस आपले गुरु मानते. त्यांनी राजाच्या मनात मीराप्रती एवढी घृणा निर्माण केली की तो मीरास आपल्या माथ्यावरचा व आपल्या जातीसाठी कलंक मानू लागला. गुरु नानक सांगतात:

भक्तां ते संसारियां जोड़ कदे न आया।

ही काही नवीन गोष्ट नाही. परमात्म्याच्या प्रियजनांच्या बाबतीत नेहमीच असे घडत आलेले आहे. परंतु ते अतिशय दृढविश्वासाने या मार्गावर दृढप्रतिज्ञ रहातात. पल्टू साहेब सांगतात:

भक्त जगत से वैर है चारो युग प्रमाण।

कोणी निंदा करो वा स्तुती करो, भक्तांवर त्याचा काहीही परिणाम होत नाही, त्यांना भक्तीमार्गावरून कोणीही दूर सारू शकत नाही. मीराबाईवर अनेक प्रकारचे पहारे लावले गेले. तिच्या नणंदेचे कान फुंकले गेले की तू हिला समजावून सांग. मीराबाईस समजावता समजावता मीराबाईंच्या भक्तीचा तिच्यावरच परिणाम झाला. ती देखील मीराबाईंचे गुणगान करू लागली.

रविदासजी जेव्हा कधी काशीतून चितौड येथे येत असत, ती त्यांच्या सत्संगाचा लाभ घेत असे. मीराबाईस तिच्या महालामध्ये कैद देखील केले गेले, परंतु मीरा तिच्या पोषाखातील ओढणींचा रस्सीसमान वापर करीत, त्यांना लटकून महालातून खाली उतरे, परंतु ती तिच्या गुरुंचा सत्संग कधी सोडत नसे. मीराबाईचा सुप्त आत्मा जागृत झाला होता.

मीराबाई त्यांच्या वाणीमध्ये एके ठिकाणी लिहितात की, जेव्हा माझ्या भक्तीचे रोप लहान होते, तेव्हा कोणी मला आळा घातला नाही आणि आता जेव्हा त्याचा वृक्ष बनलेला आहे, तेव्हा सर्वजण मला विरोध करीत आहेत. आता मी कसे बरे थांबू शकते? माझा आत्मा, माझे प्राण सतगुरु आहेत. ती तिच्या गुरुंच्या संगतीचा पुरेपुर फायदा करून घेत राहिली.

अमेरिकन बायका, रसल प्रकिन्स या आपल्या प्रतिनिधीला अनेक वर्षे विनंती करीत होत्या की त्यांनी बाबाजींना सहजोबाई किंवा मीराबाईंच्या वाणीवर सत्संग करण्यास सांगावे, ज्यामुळे आमच्या लक्षात येईल की संतमतामध्ये जेवढी उन्नती एखादा पुरुष करू शकतो, तेवढीच उन्नती एखादी स्त्रीदेखील करू शकते. संतमतामध्ये तर सुरूवातीपासूनच स्त्रीला आदर-सत्कार मिळत आला आहे. गुरु नानक तर इथपर्यंत म्हणतात:

सो क्यों मंदा आखिए जित जम्मे राजान।

ज्या स्त्री जातीपासून आपला जन्म होतो, त्यांना आपल्या पायाची वहाण समजणे, यापेक्षा आणखीन मोठा कोणता गुन्हा होऊ शकतो? संत स्त्री-पुरुषांना एकत्र बसवून नाम देतात. त्यांमध्ये कोणताही भेदभाव ते मानत नाहीत. कारण स्त्री-पुरुष सर्वांमध्ये आत्मा एकसमानच आहे. मी नेहमी सांगत असतो, जोपर्यंत आपण बाह्य जगात असतो, तोपर्यंतच आपणांस मनुष्यामध्ये हिंदू-मुसलमान, शिख, ख्रिश्चन, कासार, चांभार असा भेदभाव दृष्टीस पडतो. आपण जेव्हा संतांनी सांगितलेल्या युक्तीनुसार आपले जगामध्ये विखुरलेले लक्ष नऊ द्वारांतून काढून नेत्रांच्या पाठीमागे एकाग्र करीत आपल्या आत्म्यावरून स्थूल, सुक्ष्म आणि कारण हे तीनही पडदे दूर सारतो, तेव्हा आपण पारब्रह्मामध्ये पोहचतो. तेथे आत्म्याचा स्वयंप्रकाश प्रगट होतो. तेथे आत्म्यास ज्ञान होते की मी देखील त्याच तत्वाचा बनलेलो आहे, ज्या तत्त्वाचा परमात्मा आहे. तेथे पोहचलेला आत्मा सर्व जगास आपला समाज, समजतो, आपले घर समजतो. अशा आत्म्याचे प्रत्येक जातीशी, उच्च-निच व्यक्तीशी प्रेम असते.

त्या काळचे राजे कोणा गरीबाशी बोलताना, दोघांच्या दरम्यान आडपडदा ठेवत असत, गरीबांशी समोरासमोर बोलत नसत कि आपण दूषित होऊ नये भ्रष्ट होऊ नये. म्हणूनच राजस्थानच्या कवी चरणदासने राजा-महाराजांच्या खूप कथा सांगितल्या, परंतु त्याने मीराबाईचा कोठेही उल्लेख केलेला नाही, कारण राजघराण्यांमध्ये मीराबाईचा आदर-सत्कार केला जात नसे. परंतु प्रियजनहो! मीराबाईस या जगात येऊन साडे-चारशे वर्षे होऊन गेली, तरीही कोणी तिच्या आठवणी विसरू शकलेला नाही. कोणीही त्या वेळच्या राजांची आठवणही काढत नाहीत, परंतु मीराबाईस मात्र लोकांनी आपल्या हृदयात स्थान दिलेले आहे, तिची भजने लोकं प्रेमाने गातात. तुमच्या समोर तिची वाणी सादर केली जात आहे, ती तुम्ही काळजीपूर्वक ऐकावी:

मीरा मन मानी सुरत मैल असमानी।

मी कालदेखील सत्संगामध्ये सांगितले होते की आपण जेव्हा मुलास एखादे खेळणे देतो, तेव्हा तो अतिशय आवडीने ते खेळणे घेतो व इतर सर्व गोष्टींवरून आपले लक्ष दूर सारून तो त्या खेळण्यावर लक्ष देतो. ते खेळणे जर त्याच्याकडून काढून घेतल्यास किंवा हरवल्यास तो आरडा-ओरडा करू लागतो. मीराबाई म्हणतात,''मला माझ्या सतगुरुंद्वारे भक्तीचे खेळणे प्राप्त झाले आहे. हे राम-नामाचे खेळणे मधुर ध्वनी रूपाने सचखण्डात निर्माण होऊन, माझ्या मस्तकात येत आहे. मी त्यास त्यागू शकत नाही.'' हे खेळणे सतगुरु आपणांस कोठे देतात? आपण मन-मायाचे मंडळ पार करून सुन्न (शून्य) मंडळामध्ये जातो. तेथे हे राम-नामाचे खेळणे मिळते. यास संत अगम-अगोचर असेदेखील म्हणतात. तेथे पोहचलेला आत्मा हे खेळणे त्यागण्यास तयार होत नाही.

आपण गुरु अर्जुनदेवजींचा इतिहास वाचल्यास आपल्या लक्षात येते की त्यांचा किती अमानुष रीतीने छळ केला गेला? त्यांचा एक प्रिय मुसलमान फकीर त्यांच्याकडे गेला. त्याने गुरु अर्जुनेदवजींना तप्त तव्यावर बसलेले व डोक्यावर गरम रेती पडत असलेली पाहून तो म्हणाला,''गुरुदेव! ही काय अवस्था आहे? तुम्ही मला आदेश द्या, मी लाहोर शहरातील वीट-न-वीट फोडून टाकतो.'' त्यावर हसत आपण म्हणालात,''मियां मीर! कदाचित हे तर मी देखील करू शकतो. परंतु चमत्कार दाखविणे आपत्तीजनक आहे, इश्वरी आज्ञेचे न पालन करण्यासमान आहे.''

वडिलांचा प्रिय पुत्र कधीही वडिलांविरूद्ध बंड करीत नाही, तर तो वडिलांच्या आज्ञेचे पालन करतो. संत कधीही परमात्म्याशी बरोबरी करीत नाहीत, तर ते परमात्म्याचे अज्ञाधारी प्रिय पुत्र बनतात. ज्याप्रमाणे फुल आणि सुगंध एकमेकांपासून दूर केले जाऊ शकत नाहीत, त्याप्रमाणे संतांचे परमात्म्याशी घनिष्ट नाते असते. जसे साखरेशिवाय बत्तासे बनत नाहीत

तसे बत्ताशांशिवाय साखर बनत नाही. बत्तासे पाण्यामध्ये विरघळविल्यानंतर त्यास पाण्यामध्ये शोधण्याचा प्रयत्न केल्यास ते दिसतील का? असेच अतुट नाते संतांचे परमात्म्याशी असते. कबीर साहेब सांगतात:

राम सन्त में भेद कुछ नाहीं।

आपण सांगता दोघांमध्ये काहीच फरक नसतो. गुरु अर्जुनेदेवजी सांगतात:

हम सन्तन की रैण प्यारे, हम सन्तन की शरणा।
सन्त हमारी ओट सताणी, सन्त हमारा गहना।
सन्तन स्यों हम लेवा देवी, सन्तन स्यों व्यवहारा।
सन्तन मौको पूंजी सौंपी, तो उतरया मन का धोखा।
धर्मराय अब क्या करेगा, जो फाटयो सगला लेखा।।

संत नाम देतेवेळी त्यांच्या कृपादृष्टीने ब्रह्मस्थानात जमा असलेल्या आपल्या जन्मोजन्मांतरीच्या कर्मांचा साठा नष्ट करून टाकतात व आपणांस सांगतात, ''हे बघ प्रिया! आतापर्यंत जी काही कर्मं तू केलीस ती केलीस, यापुढे मात्र ते थांबव. यापुढे तू तुझे जीवन पवित्र कर. ध्यान-अभ्यास आणि नामस्मरण करून आपले जीवन परमार्थात सार्थकी लाव.''

पिछले अवगुण बक्श ले, प्रभ अग्गे मार्ग पावे।

जर एखादा कैदी त्याची सजा पूर्ण करून तुरुंगातून बाहेर पडतानाच मॅजिस्ट्रेटला म्हणाला की, माझे सामान कोणासही देऊ नका, मी लगेच परतणार आहे. तर त्यात मॅजिस्ट्रेटचा काय दोष? कबीर साहेब सांगतात:

गुरु बेचारा क्या करे जे सिक्खन में चूक।
अंधे एक न लग्गी ज्यों बाँस बजाई फूँक।।

नाम घेतल्यानंतरही आपण जर वाईट कर्मं करीत राहिलो, तर त्यामध्ये संतांचा काय दोष? त्यांनी विनामुल्य आपणांस त्यामार्गी लावले, ज्यामार्गावर येण्यासाठी ऋषी-मुनी देखील तरसत होते. ऋषी-मुनी जप-तप करून हरले, परंतु त्यांना हे राम-नामाचे खेळणे काही मिळाले नाही, कारण त्यांना अंतर्यामध्ये जाण्याचा मार्ग मिळाला नव्हता, अंतर्यामध्ये घेऊन जाणारे परिपूर्ण सतगुरु त्यांना लाभले नव्हते.

मीराबाई सांगत आहे,''माझ्या मनाने मान्य केले आहे की माझा आत्मा शरीराचा हिस्सा राहिला नसून तो त्याच्या मर्जीने सच्चखण्डात भरारी घेतो. हे शरीर वृद्ध होते. याच्या भिंती भक्कम राहत नाहीत, तर त्या हलू लागतात. ज्यास आपण म्हणतो की हात-पाय डळमळू लागले आहेत. खरेतर हा आपल्यासाठी इशारा असतो की आतातरी आपण ध्यान-अभ्यास करावा, परंतु तरीही आपले मन ते मान्य करीत नाही.

जीवनाचा दिवा मालवत असतो, रात्र अंध:कारमय होऊ लागलेली असते, यमदूत अंतरात तंबू ठोकून बसण्याच्या तयारीत असतात, परंतु असे असूनही हा जीव हाती भिक्षापात्र घेऊन दारोदारी तेल मागत फिरत असतो की जेणेकरून जीवनाचा दिपक कसाबसा तेवत राहावा. आपले कधी एका डॉक्टरकडे तर कधी दुसऱ्या डॉक्टरकडे जाणे हे तेल मागण्यासारखेच आहे. परंतु आता काय होऊ शकणार? यमदूत अंतरात मुक्काम ठोकून असतात, ते या शरीररूपी किल्ल्यावर ताबा मिळवितात. फरीद साहेब सांगतात:

दो दीवे बलेंदया, मलिक बैठा आए।
गढ़ लीता घट लुटया, दीवड़े गया बुझाए।।

ते आपल्या डोळ्यांदेखतच येऊन बसतात. या शरीररूपी किल्ल्याची वा गढाच्या नेत्रांचे तेज नाहीसे होते. अनेकदा मृत्युसमयी लोक समोर आरसा ठेवून विचारतात की यामध्ये काही दिसत आहे का? अनेक लोक दिवा पेटवून त्यास विचारतात, ज्योत दिसते काय? संत सांगतात, हे सर्व तुम्ही यापूर्वीच करणे गरजेचे होते. अंतर्यामध्ये ज्योत पहावयाची होती, तर ती जिवंतपणीच पहावयास हवी होती. ती राम-नामाची ज्योत स्त्री-पुरुष, सर्वांच्याच अंतर्यात आहे, कोणाच्या अंतर्यात नाही? पल्टू साहब सांगतात:

भजन तेल की धार साधना ऐसी साधी।

असे महात्मा नेत्र बंद करताच परमेश्वराजवळ पोहचतात तर नेत्र उघडताच या जगात येतात. पाण्याची धार खंडीत होते, परंतु तेलाची धार खंडीत होत

नाही, याचप्रमाणे त्यांची वृत्ती या जगात येऊनही खंडीत होत नाही. मीराबाई प्रेमाने सांगत आहेत,''आता कोणी माझी निंदा करो वा मला बरे–वाईट काहीही म्हणो, मला ज्याची बनायचे होते, त्याची मी बनलेली आहे.''

जब जब सुरत लगे वा घर की, पल पल नैनन पानी।।

मीराबाई आता विरह ग्रस्त लोकांची परिस्थिती सांगत आहेत की जेव्हा त्याबाजूला आपले लक्ष जाते, तेव्हा अंतर्यात सुरत चढते, गुरुंची आठवण जेव्हा येते, तेव्हा क्षणोक्षणी नेत्रांमधून आपोआप अश्रुधारा वाहू लागतात. शिष्याचा शोध गुरुच करतात. गुरुच शिष्याच्या अंतरात विरह निर्माण करतात. ज्याने विरह निर्माण केलेला असतो, त्यांस त्याचे ज्ञान असते.

महाराज कृपालजींच्या आयुष्यातील घटना कालदेखील सत्संगामध्ये सांगितली गेली होती. ते नोकरीच्या कार्यकालावधीत लाहोर येथे एकदा त्यांच्या कचेरीमध्ये काम करीत होते. जेव्हा कधी त्यांना त्यांचे गुरुदेव महाराज सावन सिंहजींची आठवण येई, त्यांच्या नेत्रांमधून अश्रू वाहू लागत असत. त्या अश्रुंनी तेथील फाईल्स देखील भिजून जात असत. त्यांचे नेत्र मिटलेले असत. अशावेळी त्यांचे परिपूर्ण गुरु बेफिकीर रहात नसत, कारण ज्यांनी बाण सोडलेला असतो, त्यांना माहीत असते. डेरा ब्यास पासून लाहोर पर्यंतचे अंतर खूप दूरवरचे आहे. महाराज सावन सिंहजी देखील त्यावेळी सेवादारांस सांगत असत की मला लाहोरला जायचे आहे. जेव्हा ते पोहचत असत तेव्हा कृपालजींचे नेत्र मिटलेले असत, परंतु हाताने त्यांचे काम चालूच असे. अशी अवस्था विरहाने ग्रस्त झालेल्या आत्म्यांची होते. ज्यांनी विरह निर्माण केलेला असतो, त्यांना त्या अवस्थेची कल्पना असते.

म्हणूनच मीराबाई सांगतात कि ज्याच्या अंतरात परमात्म्याच्या गाठीचा विरह निर्माण होतो, त्याच्या नेत्रांमधून अश्रुधारा वाहू लागतात; त्या धारा कितीही प्रयत्न केला तरी थांबत नाहीत.

राबिया बसरी नावाची एक फकीर मुसलमानांमध्ये होऊन गेली. तिला कोणीतरी विचारले की,''तू परमात्म्याच्या आठवणीत कधी बसतेस? तुला कसे कळते की परमात्मा आत्ता येणार आहे?'' राबिया बसरीने उत्तर दिले, ''माझ्या हृदयात तळमळीच्या तीव्र कळा उठू लागतात, माझ्या नेत्रांमधून आपोआप अश्रुंच्या धारा वाहू लागतात, तेव्हा मला समजते की आता परमात्म्याची येण्याची वेळ झालेली आहे. मी त्याच्या नामामध्ये तेव्हा तल्लीन होऊन जाते.'' अशाच परिस्थितीचे वर्णन मीराबाई करीत आहेत, ज्यांची अशी अवस्था होते, त्यांच्या नेत्रांमधून क्षणोक्षणी अश्रू झिरपू लागतात. ते काही संसारीक धनसंपत्तीसाठी रडत नसतात. ते तर त्यांच्या परम प्रिय गुरुंना अंतर्यात प्रगट करण्यासाठी रूदन करतात. कबीर साहेब सांगतात:

सुखिया सब संसार है खाए और सोए।
दुखिया दास कबीर है जागे और रोए।।

ज्यों हिये पीर तीर सम सालत, कसक कसक कसकानी।।

एखाद्याच्या हृदयात बाण लागल्यावर तो जर निघत नसेल व जर तो काढण्याचा प्रयत्न केल्यास, बाण आणखीन आत रूतत असेल, तर त्याच्या अवस्थेसारखीच भक्तांची अवस्था असते. असे केवळ मीराबाईच सांगत नाही. तुम्ही इतरही महात्म्यांची वाणी वाचून पाहू शकता!

गुरु रामदासजी महाराज आपल्या विरहाच्या वेदनेचे वर्णन करताना सांगतात,''आमच्या अंत:करणात परमात्म्याचा शोध घेण्याची इच्छा निर्माण झाली. आम्ही परमात्म्यास जंगल, पर्वत आणि पवित्र नद्यांमध्ये स्नान करून प्रत्येक ठिकाणी शोधले. परंतु तो प्रिय परमात्मा काही भेटला नाही. आम्ही जेव्हा गुरु अमरदेवजींना शरणी गेलो, तेव्हा ते म्हणाले, प्रिय शिष्या! तू ज्यास भेटू इच्छितोस, तो तर तुझ्या अंतर्यातच आहे. त्यांचे हे वचन माझ्या अंत:करणात एखाद्या बाणाप्रमाणे लागले की मी इतके जन्म घेतले! तो प्रिय

परमात्मा माझ्या अंतरात आहे, परंतु मी मात्र त्यास बाह्यजगामध्ये शोधत आहे?'' गुरु तेगबहादुरजी महाराज सांगतात:

काहे रे वन खोजन जाई।
सर्वनिवासी सदा अलेपा तोही संग समाई।
पोहप मद्य ज्यों वास वसत है मुक्कर में जैसे स्याही।
तैसे ही हर वसे निरंतर घट ही खोजो भाई।
बाहर भीतर ऐको जाने ऐह गुरु ज्ञान बताई।।

गुरुसाहेब सांगतात, ''तुम्ही बाहेर जंगल–पर्वतांमध्ये धक्के खात का फिरत आहात? स्वत:हून तुम्ही परमात्म्यास प्राप्त करू इच्छित असलात तरी प्राप्त करू शकत नाहीत. ज्याप्रमाणे साबणाशिवाय कपडे स्वच्छ होत नाहीत, घोड्याशिवाय प्रवास होत नाही, आई–वडिलांशिवाय अपत्य जन्मास येत नाही, साधूशिवाय दरबार शोभत नाही, तसेच संतांशिवाय आपणांस नाम प्राप्त होऊ शकत नाही.'' मीराबाईदेखील हेच सांगतात, परमात्म्याच्या दरवाजावर जर कोणी पहारेकरी असतील तर ते संत असतात. परमात्म्याने त्याच्या दरवाजाची चावी त्याच्या प्रिय संतांच्या हाती सोपविलेली असते. गुरु नानक सांगतात:

जिसका गृह तिस दिया ताला, कुंजी गुरु सौंपाई।
अनिक उपाय करे नहीं पावे, बिन सतगुरु शरणाई।
जिनके बंधन काटे सतगुरु तिन साध संगत लिव लाई।।

ज्या परमात्म्याने हे शरीर बनविलेले आहे, त्याने त्यास कुलुप लावले असून त्या कुलुपाची चावी महात्म्यांच्या ताब्यात दिली आहे. ज्यांना परमात्मा तारू इच्छितो, त्यांना सर्वप्रथम तो साधूंच्या संगतीमध्ये आणतो. सत्संग ऐकल्यावर आपल्या भरकटलेल्या मनास भान येते की आपले घर कोठे आहे? व आपण कोठे भरकटतो आहोत? गुरु रामदासजी सांगतात:

अंतर प्यास उठी प्रभ केरी, सुण गुरु वचन मन तीर लगईया।
हौं आकल विकल भई गुरु देखे, हौं लोट पोट होई पईया।।

गुरुंचे वचन माझ्या अंत:करणात एखाद्या बाणाप्रमाणे रूतले. मी सतगुरुंच्या सांगण्यानुसार शरीराची नऊ द्वारे मोकळी करून सूर्य, चंद्र, तारे पार करून गुरुंना अंतर्यात प्रगट केले. नि:संशय! मी बाहेर कितीही सुशिक्षित असलो, तरी ते सर्व शिक्षण मी विसरून गेलो. अंतरामध्ये जाऊन पाहिले की बाहेर पाच इंद्रियरूपी कपडे धारण केलेले सतगुरु अंतर्यात देखील आहेत.

रात दिवस मोहिं नींद न आवत, भावे अन्न न पानी।।

महात्मा चरणदासजींनी देखील सांगितले आहे कि परमात्म्याचे प्रेमी कधीही पोट भरून अन्न ग्रहण करीत नाहीत. रात्री त्यांना निद्रा येत नाही तसेच दिवसा ते सतगुरुंचे मनमोहक स्वरूप नजरेसमोर ठेवून अस्वस्थ होत फिरत असतात. गुरु अर्जुनदेवजी स्वत:च्या निद्रेस सांगतात, तू कमी हो व रात्रीस सांगतात तुझी वाढ होऊ दे, जेणेकरून माझी माझ्या प्रिय गुरुंशी दिर्घकाळ भेट व्हावी.

ऐसी पीर बिरह तन भीतर, जागत रैन बिहानी।।

महात्मा सांगतात रात्रीचे जागरण चोर किंवा भोगीजन करतात. कर्मांचे ओझे अगोदरच त्यांच्या डोईवर असते, त्या ओझ्यामध्ये ते आणखीन वाढ करतात. तसेच रात्री परमात्म्याचे प्रियजनही जागतात. ते रात्रभर परमात्म्याशी एकरंग होतात. ते निद्रा केवळ शरीरास हलके करण्यापुरतीच घेतात. शरीर हलके करण्यासाठी तीन–चार तासांची निद्रा पुरेशी असते. आपली भूक आणि निद्रा आपण आपल्या इच्छेनुसार वाढवू शकतो वा कमी करू शकतो.

महाराज कृपाल सांगत असत, ''तुम्ही रात्रींचे रूपांतर जंगलातील एकांतात करा. ज्यांनी रात्रीच्या निद्रेवर नियंत्रण मिळविले, त्यांनी सर्व गोष्टींवर नियंत्रण मिळविल्यासारखे आहे.'' फरीद साहेब सांगतात:

पहले पहरे फुलड़ा फल की पीछे रात।
जो जागणंगे सो ले लेंणगे साईं कन्नियों दात।।

जे रात्रीचे जागरण करतील, त्यांनाच त्यांचे इष्ट प्राप्त होईल. एकदा एका प्रेमीने महाराज सावनजींच्या चरणी माथे टेकविले. लोकांनी चरणावर माथे टेकविलेले संतांना आवडत नाही. त्यांनी त्या प्रेमीस झिडकारले. त्यावर दुसरा प्रेमी म्हणाला की आम्हा जीवांच्या हाती केवळ हेच आहे, तेव्हा तुम्ही कृपा करावी. त्यावर महाराज सावन उत्तरले की,''**मी पहाटे तीन वाजता प्रत्येक सत्संगीकडे कृपेची टोपली घेऊन जातो, परंतु सर्वजण झोपलेले असतात, दया कोणावर करू?**'' फरीद साहेब देखील म्हणतात:

रात कस्तूरी वंडया, सुत्तया मिल न भाव।
जिन्हां नैन निंद्रावले, तिन्हां मिलण क्वाओ।।

रात्री परमात्मा त्याच्या प्रियजनांस नामाची कस्तुरी वाटण्यासाठी फिरत असतो. परंतु जे पोटभर अन्न खाऊन झोपलेले असतात, त्यांना ती कस्तुरी कशी बरी मिळेल?

ऐसा वैद मिलै कोई भेदी, देस बिदेस पिछानी।।

परमात्म्याच्या प्रियजनांनी त्याचा शोध घेण्यात कोणतीही कसर बाकी ठेवलेली नसते. कोणत्याही महात्म्यांचे जीवनचरित्र वाचून पहा, तुम्हांस कळेल की, त्यांनी खूप शोधकार्य केलेले असते. महाराज सावन सिंहजी स्वत:च्या बाबतीत सांगत असत की मी बावीस वर्षे गुरुंचा शोध घेतला. मी माझ्याबद्दल सांगत असतो की मी हृदयात कोणतीही भीडा न बाळगता शिवलिंग, मंदिर, मस्जिद, चर्च या सर्व ठिकाणी प्रेम भावाने माथे टेकले. या सर्वांप्रती माझ्या हृदयामध्ये आदर, प्रेम होते. त्याकाळी पंजाबमधील लोक जलाधारे (हिवाळ्यात पाण्याची धार डोक्यावर सोडून केलेला तप) आणि धुनीतप (उन्हाळ्यात चोहोबाजूंनी अग्नी लावून केलेला तप) देखील करीत असत. त्यावेळी हे रितीरिवाज देखील मी अतिशय प्रेमाने केले. विशेषत: मी धुनीतप त्यावेळी केला जेव्हा आम्ही काश्मिरची लढाई संपवून परत आल्यावर सरकारने आम्हाला सिमला मधील पर्वतांवर एक वर्षाचा कालावधी सुट्टीवर



जाण्यासाठी दिला होता की हे अतिशय थंड प्रदेशात युद्ध करून परतले आहेत. परंतु प्रियजनहो! प्रेम हे प्रेमच असते, तळमळ ही तळमळच असते. थंड प्रदेशात सुट्टीचा आनंद न घेता जे जून महिन्यात चोहोबाजूंनी अग्नी पेटवून चाळीस दिवस धूनीतप केले जाते, ते मी त्यावेळी केले.

बाबा बिशनदासजींद्वारा मला दोन–शब्दांचे नाम प्राप्त झाले होते. मी धुनीतप केल्यानंतर जेव्हा बाबा बिशनदासजींकडे गेलो, तेव्हा ते म्हणाले, ''भल्या माणसा! अग्नी तर अंतरात अगोदर पासूनच खूप प्रज्वलीत झालेला आहे. कामाग्नी मनुष्यास अनावर करून टाकतो, कामी मनुष्य आपले नाते–संबंधच विसरून जातो, कारण कामी मनुष्य बेशरम बनतो. अंतरामध्ये क्रोध आणि लोभाचाही अग्नी असतो. पाच अग्नी तर अंतरातच आहेत, सहावा वरील सूर्याचा अग्नी आहे. बाहेर आणखीन सातवा अग्नी पेटवून शेजारी बसल्यास काय फरक पडणार आहे?''

गुरु नानकदेवजींच्या अंतरात जेव्हा असाच विरह होता, तेव्हा त्यांच्या आई–वडिलांनी उपचारासाठी वैद्य बोलाविला तसेच भूतबाधा दूर करणाऱ्या मांत्रिकास बोलावले की याच्यावर भूत–प्रेताची सावली पडली असावी. गुरु नानकदेवजी त्यांच्या वाणीत लिहितात:

वैद्य बुलाया वेदगी, पकड़ ढिंढोले बाँह।
भोला वैद्य न जाणें, कर्क कलेजे माँह।।

वैद्य नाडीपरीक्षा करतो. परंतु विरहाची वेदना तर हृदयामध्ये आहे. त्यामुळे वैद्यास त्यावेदनेची काय कल्पना? हे म्हणजे असे आहे की हृदयामध्ये वेदना आहे व वैद्य डोळ्यात औषध टाकीत आहे. लोक मला पाहून म्हणतात:

कोई आखे भूतना कोई कहे बेताला।
कोई आखे आदमी नानक बेचारा।।

कोणी म्हणतो याच्यावर भूताची सावली पडली आहे तर कोणी म्हणतो याच्यावर प्रेताची सावली पडली आहे आणि कोणी म्हणतो काळूचा मुलगा नानक बिचारा औषधोपचार न केल्याने तो भर दुपारी उन्हामध्ये भटकत असतो. प्रियजनहो! असे लोक अंतरातून सचेत असतात, स्वत:च्या असली घराच्या शोधामध्ये ते असतात. ते अशा व्यक्तीच्या शोधात असतात जो परमात्म्याच्या आठवणीत जागृत झालेला असतो. मीराबाईदेखील स्वत:च्या जीवनाच्या अशाच परिस्थितीचे वर्णन करत आहे की माझ्या आजाराचे निदान करू शकणाऱ्या वैद्यांचा मी जागोजागी शोध घेत आहे.

तासों पीर कहूं तन केरी, फिर नहिं भरमों खानी।।

मीराबाई सांगत आहेत, मी माझा दर्द त्यासच सांगेन ज्यास हा दर्द असावा, मग मला जन्म-मरणाचे दु:ख सहन करावे लागणार नाही.''

खोजत फिरों भेद वा घर को, कोई न करत बखानी।।

मीराबाई सांगत आहेत,''मी रात्रंदिवस परमात्म्याचा शोध घेत फिरत आहे. ब्राह्मण, मौलवी, पंडित सर्वांनाच परमात्म्याबद्दल विचारीत आहे, परंतु कोणीही मला खात्री देत नाही की मी अंतर्यामध्ये जात असून, तुलाही सोबत घेऊन जाईन.''

रैदास संत मिले मोहिं सतगुरु, दीनी सुरत सहदानी।।

मुल जेव्हा सर्व गोष्टीं मधून आपले लक्ष काढून आईसाठी रडू लागते तेव्हा आईस देखील राहवत नाही. ती आपल्या हातातील सर्व कामं सोडून मुलाची गरज भागवते.

आत्मा परमात्माचा अंश आहे, त्याचे मुल आहे. जेव्हा ते मुल परमात्म्याच्या शोधात जागोजागी तळमळत फिरत असते, तेव्हा त्यासदेखील राहवत नाही. परमात्म्याने मीराबाईची भेट गुरु रविदासजींशी करून दिली. गुरुंनी कृपेचा वर्षाव करून तिला परमात्म्याच्या घरी जाण्याचा मार्ग दर्शविला. जे नामकमाई करतात त्यांना माहित आहे की, सतगुरु प्रत्येक टप्प्यावर आपली मदत करतात.

मैं मिली जाय पाय पिया अपना, तब मोरी पीर बुझानी।।

मीराबाई सांगत आहेत,''माझ्या अंतरात रात्रं-दिवस विरहाची वेदना होती. त्या वेदनेमुळे मला रात्री झोप येत नसे. मी आता प्रभु परमात्म्यास भेटली असून, आता माझ्या हृदयातील विरहाची वेदना नाहीशी झाली आहे.

मीरा खाक खलक सिड डारी, मैं अपना घर जानी।।

मीराबाई सांगत आहेत,''मला माझ्या मोठेपणाची वा निंदेची आता पर्वा नाही. मी ज्या घरातून आले होते, ते घर मला पुन्हा प्राप्त झाले आहे.''

***

हरीचे नाम

सत्संग: परमसंत अजायब सिंहजी महाराज, गुरु अर्जुनदेवजी महाराजांची वाणी
सन्त बानी आश्रम, १६ पी एस, राजस्थान, – ७ ऑक्टोबर, १९८०

हरि का नामु जन कउ भोग जोग।।
हरि नामु जपत कछु नाहि बिओगु।।

गुरु अर्जुनदेवजी महाराज प्रेमाने सांगतात ज्याप्रमाणे संसार कामभोगांमध्ये मग्न आहे व त्या पलिकडे दुसरे काहीच नाही असा संसाराचा समज आहे, त्याप्रमाणे संतांसाठी भोग व योग केवळ नामाशी समरस होणे हाच आहे. सन्त सदैव नाम जपण्यात एकरंग झालेले असतात.

जनु राता हरि नाम की सेवा।।
नानक पूजै हरि हरि देवा।।

आता गुरु अर्जुनदेवजी महाराज सांगतात, जे महात्मा उठता–बसता, चालता–फिरता, निद्रावस्थेत–जागृतावस्थेत शब्द–नामाशी समरस झालेले असतात, ते नामात एकरूप झालेले असतात. ब्रह्मा, विष्णु, महेश तसेच तेहत्तीस करोड देवता, अशा महात्म्यांची पुजा करतात, त्यांचा उदो–उदो करतात आणि त्यांना वाकून नम्रपणे वंदनही करतात.

जगत पास से लेते दान गोविंद भक्त को करे सलाम।

हरि हरि जन कै मालु खजीना।।
हरि धनु जन कउ आपि प्रभि दीना।।

संतांकडे खऱ्या अर्थाने जर कसला खजिना असेल तर तो नामाचा खजिना असतो. परमात्म्याने स्वत: कृपा–वर्षाव करीत तो नामाचा खजिना संतांना दिलेला आहे. त्यांनी तो नामाचा खजिना जगात कितीही लोकांना जरी वाटला, तरीही तो कधीही रिक्त होत नाही.

हरि हरि जन कै ओट सताणी।।
हरि प्रतापि जन अवर न जाणी।।

गुरु अर्जुनदेवजी प्रेमाने सांगतात, संत आणि भक्तांना परमात्म्याचाच आधार असतो. ते परमात्म्याशिवाय इतर कोणाचाही आसरा ठेवत नाहीत.

ओति पोति जन हरि रसि राते।।
सुनं समाधि नाम रस माते।।

विणकामात वापरले जाणारे ताणा (उभे सूत) व बाणा (आडवे सूत) यांमध्ये जसे एकसारखेच सूत असते व ते एकमेकांत गुंतलेले असते, तसेच संत परमात्म्यामध्ये ताणा-बाणा प्रमाणे एकमेळ झालेले असतात.

आठ पहर जनु हरि हरि जपै।।
हरि का भगतु प्रगट नहीं छपै।।

आता गुरु अर्जुनदेवजी महाराज सांगत आहेत, जो अष्टौप्रहर नामाचा जप करीत असतो, नामामध्ये रत (निमग्न) झालेला असतो, त्याचे अस्तित्व कितीही प्रयत्न केले तरी लपू शकत नाही, तो प्रगट होतोच. आपणांस माहित आहे की सूर्य उगवल्यानंतर सर्व जगास प्रकाशमय करतो. तरीही घुबड व वटवाघळे सूर्याचा प्रकाश असतो असे मानण्यास तयार नसतात. तुम्हीच विचार करा! यामध्ये सूर्याची काय चूक असू शकते?''

त्याचप्रमाणे महात्मा शब्द-नामाची कमाई करीत रात्रंदिवस शब्दध्वनीमध्ये निमग्न झालेले असतात. ते या जगामध्ये प्रगट होऊन शब्द-नामाचा प्रचार करतात, परंतु जगामध्ये अशीही मनमुख लोकं असतात जे त्यांना पाहू शकत नाहीत, त्यांना समजू शकत नाहीत. महात्मा चतुरदास सांगतात:

इक दिन सभा उल्लुआँ लाई, बैठे मिल नर नारी जी।
कोई आखे सूरज नाहीं, कौन करे उजयारी जी।
वारो वारी सब बोले, कर कर सोच विचारी जी।

इक ओना विच वड्डा उल्लू, बाणी ओस उचारी जी।।
आज तक सूरज हम नहीं डिट्ठा, वड्डी उमर हमारी जी।
जे कोई सूरज सच्चा मन्ने, अकल ओस दी मारी जी।
एक हंस टीसी पे बैठा, बाणी ओस उचारी जी।
है प्रभात देख लो सारे, लक्खां किरण पसारी जी।
चमगीदड़ घुघु आए बैठे, किया न्याय संभारी जी।
उल्लू सब टैं टैं कर हँसे, हंस मौन तब धारी जी।
चतुरदास ऐह अजब अदालत, तीन लोक से न्यारी जी।।

जास्त शिकल्या–सवरलेल्या मनुष्यास मोठे घुबड म्हटले गेले आहे. ते म्हणतात कि मी इतक्या ग्रंथ–पोथ्यांचे अध्ययन केलेले आहे. परमात्मा जर अस्तित्वात असता, तर मला दिसला नसता का?

हरि की भगति मुकति, बहु करे।।
नानक जन संगि केते तरे।।

आपण सांगता परमात्म्याचे प्रियजन हरीची भक्ती करतात. म्हणून ते स्वत: तर तरून जातातच, परंतु जे त्यांच्या आसऱ्याने नाम जपतात, ते सुद्धा मुक्ती प्राप्त करतात. अशा लोकांची मोजदादही होऊ शकत नाही.

पारजातु इहु हरि को नाम।।
कामधेन हरि हरि गुण गाम।।

आपण सांगता की, स्वर्गामध्ये परिजात नावाचा एक वृक्ष आहे, ज्याच्या खाली बसल्याने आपल्या सर्व इच्छांची पूर्ती होते. कामधेनु गाईबद्दल देखील सांगितले जाते की, ती सर्व इच्छांची पूर्ती करते. परंतु आपण जर नामाची कमाई केली तर त्यामध्ये सर्व प्रकारच्या इच्छापूर्तींची फळे येतात.

सभ ते ऊतम हरि की कथा।।
नामु सुनत दरद दुख लथा।।

सर्व कथांच्या पठणापेक्षा, शिक्षणापेक्षाही हरिकथा श्रेष्ठ आहे.

नाम की महिमा संत रिद वसै।।
संत प्रतापि दुरतु सभु नसै।।

नामाचा महिमा व महानते विषयी संतच जाणतात. संतांच्या प्रतापामुळे यम आपल्या जवळ येत नाही. आपण त्यामुळे निर्धास्त असतो.

संत का संगु वडभागी पाईऐ।।
संत की सेवा नामु धिआईऐ।।

गुरु अर्जुनदेवजी महाराज सांगतात संतांची संगत अतिशय भाग्यशाली जिवांनाच लाभते. आपण जेव्हा संतांची सेवा करतो, तेव्हा ते आपणांस नाम जपण्यास सांगतात. आपण त्यांच्या सान्निध्याचा असा फायदा करून घेतो की आपण शब्द–नामाची कमाई करू लागतो. कबीर साहेब सांगतात:

ईन्द्र की एक घड़ी कुँआ बारह मास।
सतसंग की एक घड़ी सिमरन बरस पचास।।

पर्जन्यदेव इंद्र प्रसन्न झाल्यावर एका घडी भरामध्ये इतका पाऊस पाडतो की तितके पाणी आपण एखाद्या विहीरीतून बारा वर्षे सतत उपसूनही काढू शकत नाही. ध्यान–अभ्यास करणाऱ्या महात्म्यांच्या सान्निध्यामध्ये बसण्याचे फळ, आपल्या घरी बसून पन्नास वर्षे नामस्मरण करून मिळालेल्या फळापेक्षा कितीतरी मोठे आहे.

नाम तुलि कछु अवरु न होइ।।
नानक गुरमुखि नामु पावै जनु कोइ।।

गुरु अर्जुनदेवजी महाराज अखेरीस सांगतात, नामाची बरोबरी, ना जप, ना तप, ना पूजा–पाठ करू शकते. नाम आपणांस संत–महात्म्यांद्वारेच प्राप्त होते. ते कोणत्याही पोथीमध्ये वा मंदिर–मस्जिदीमध्ये मिळत नाही. नाम संतांच्या अंतरामध्ये वसत असते. परमात्म्याने त्यांच्या अंतरामध्ये नामाचे खजिने ठेवलेले असतात.



लाहोरमध्ये बुल्लेशाहा मशिदीचे काजी होते. त्यांच्या अगोदर त्यांचे वडिल काजी होते. बुल्लेशाह खूप शिकले–सवरलेले यथेष्ट विद्वान होते. मुसलमान धर्मात केले जाणारे सर्व नित्यनेम ते दररोज करीत असत. लाहोरच्या जवळच ईनायत शाह शेतकाम करीत असत.

एकदा बुल्लेशाहजींची ईनायत शाहजींच्या एका शिष्याशी भेट झाली. तो शिष्य बुल्लेशाह यांस म्हणाला, ''मियाँ! तू दररोज घसा फाडत असतोस, तू ईनायत शाहकडे जा. ते तुझे कान उघडतील.'' ईनायत शाहकडे जाऊन बुल्लेशाह म्हणाला, ''महाराज! मी तुमच्याकडून कलमा (दीक्षा) घेण्यासाठी आलो आहे. मी परमेश्वरास प्राप्त करून घेण्यासाठी आलो आहे. तेव्हा आपण मला परमेश्वर प्राप्तीचे साधन आणि मार्ग आपण सांगा.''

ईनायत शाह अशिक्षित होते व बुल्लेशाह शिकले–सवरलेले होते. ईनायत शाहांनी विचार केला, मी याला जर पोथींमधील उदाहरणे दिली तर काही उपयोग होणार नाही, कारण याने खूप पोथ्यांचे पठण केलेले आहे. त्यावेळी ईनायत शाह शेतामध्ये रोपे लावण्याचे काम करीत होते. आपण म्हणालात:

देख बुल्लया! रब दा की पावणा इधरो पुट्टणा ते ओधर लावणा।

आपले मन जगातून काढून परमात्म्याच्या मार्गी आणणे गरजेचे आहे. बुल्लेशाहांवर लगेच नामाचा रंग चढला. मी नेहमी सांगत असतो की, प्रेमी आत्म्याचे सतगुरुंजवळ जाणे हे फटाक्यांच्या कोरड्या दारूस आगीजवळ नेण्याप्रमाणेच असते.

महाराज सावन सिंहजी सांगत असत,''परमार्थ प्राप्तीसाठी एम.ए. पास केलेल्या व्यक्तीस पाच वर्षाच्या बालकाप्रमाणे अज्ञानी व्हावे लागते.'' बुल्लेशाह देखील म्हणाले होते:

इलमो बस करीं ओ यार, इक्को अलफ तेरी दरकार।

बुल्लेशाह सैयद जातीचे होते. मुसलमानांमध्ये सैयद जातीच्या लोकांना पुजले जाते, खूप मान दिला जातो. परंतु बुल्लेशाहजींचे गुरु ईनायत शाह अराई जातीचे होते. अराई जातीस मुसलमान लोकं नीच जात मानतात. बुल्लेशाहांनी अराई जातीचे गुरु धारण केल्यावर लोकांनी त्यांची निंदा करण्यास सुरूवात केली की, स्वत: सैयद असूनही याने एक अराई जातीचा गुरु धारण केला आहे. लोक निंदा करीत होते पण बुल्लेशाह शांत राहिले. ते म्हणाले, ''ठीक आहे! करू दे यांना निंदा.''

निन्दो निन्दो मुझे तो मालिक से मिलने का शौक है।

आपणांस कल्पना आहे की लोक जेव्हा साधूची निंदा करतात, तेव्हा साधू अंतरातून आणखीन प्रबळ होतात. निंदा करून लोक साधूच्या पापांचे ओझे हलके करीत असतात.

लोकांनी आणखी निंदा करावी म्हणून बुल्लेशाहांनी गाढवे घेऊन त्यांना चरावयास नेण्यास सुरूवात केली. हे पाहून लोकांमध्ये खळबळ माजली की सैयदांचा मुलगा गाढवे चारीत फिरत आहे.

एका पठाणाने, एका गरीबाच्या पत्नीचे अपहरण केले होते. त्यास एकाने सांगितले की, बुल्लेशाह ध्यान–अभ्यासाची कमाई करणारा फकीर असून,

तुझ्या पत्नीचा शोध घेण्यासाठी तू त्याच्याकडे जावेस. तो बुल्लेशाहकडे गेला असता, बुल्लेशाह म्हणाले, ''बघ! कोणी नाच–गाणे तर करीत नाही ना?'' त्याने सांगितले की तेथे काही लोकं नाचत आहेत. बुल्लेशाहा त्या नाचणाऱ्या लोकांमध्ये जाऊन नाचू लागले आणि नाचत–नाचत गाऊ लागले:

अम्बियां वाली गली सुणादी, खज्जी वाला बाग।
खोतियां वाला साध बुलौंदा, सुत्ती ऐ ते जाग।
चींणा ईंज छड़ीदा यार.....।।

जेव्हा बुल्लेशाहने लक्ष एकाग्र केले तेव्हा ती स्त्री आपोआपच तेथे चालत आली. बुल्लेशाह त्या गरीब मनुष्यास म्हणाले, ''तू हिला घेऊन जा.''

लोकांनी बुल्लेशाहजींच्या वडिलांना सांगितले की, ''पहा! तुमच्या मुलाने तुमचे नाव किती प्रसिद्ध केले आहे ते. अगोदर गाढवे घेतली आणि आता मरासियांबरोबर नाच करीत आहे.'' बुल्लेशाहांचे वडील हातामध्ये जपमाळ घेऊन काठीच्या सहाय्याने धडपडत बुल्लेशाहकडे जात होते. कोणीतरी बुल्लेशाहला सांगितले की, ''पहा! तुझे वडील येत आहेत.'' बुल्लेशाहने विचार केला! आज वडील देखील काही प्राप्त केल्याखेरीज कोरडेच जाऊ नयेत. त्यांच्याकडे पाहत बुल्लेशाह म्हणाले:

लोकां दे हथ मालियां, बाबे दे हथ माल।
सारी उमर जपेंदिया, खुथ न सका बाल।
चींणा ईंज छड़ीदा यार.....।।

वृद्ध वडील लोकलज्जा विसरून गेले. तेथे लाहोरचे दोन्ही काजी नाचू लागले. वृद्ध वडिलदेखील म्हणाले:

पुत्र जिन्हांदे रंग रंगीले, माँ प्यों लेंदे तार।
चींणा ईंज छड़ीदा यार.....।।

***

धन्य अजायब

परमसंत अजायब सिंह महाराजांच्या मधुर आठवणीतील
अहमदाबाद व दिल्ली शहरातील कार्यक्रमांची माहीती

दिल्ली येथील सत्संगाचा कार्यक्रम

गुरुप्रेमी साधूसंगत,

परमसंत अजायब सिंहजी महाराजांच्या कृपेने दरवर्षीप्रमाणे यंदा देखील दिल्ली येथे २२, २३ आणि २४ मे २०१५ रोजी निम्नलिखित पत्त्यावर कार्यक्रम आयोजित केला गेला आहे. सर्व प्रेमी बंधु-भगिनींच्या चरणी नम्र विनंती आहे की, सत्संगासाठी येऊन संत-वचनांचा लाभ घ्यावा.

कम्युनिटी हॉल

भेरा इन्कलेव, पश्चिम विहार (पीरागढ़ी चौकाजवळ),
नवी दिल्ली ११० ०८७
फोन: ९८१०२ १२१३८, ९८१०७ ९४५९७ आणि ९८१८२ ०१९९९

अहमदाबाद येथील सत्संगाचा कार्यक्रम

गुरुप्रेमी साधूसंगत,

परमसंत अजायब सिंहजी महाराजांच्या कृपेने दरवर्षीप्रमाणे यंदा देखील अहमदाबाद येथे ३, ४ आणि ५ जुलै २०१५ रोजी निम्नलिखित पत्त्यावर कार्यक्रम आयोजित केला गेला आहे. सर्व प्रेमी बंधु-भगिनींच्या चरणी नम्र विनंती आहे की, सत्संगासाठी येऊन संत-वचनांचा लाभ घ्यावा.

ईश्वर भवन

क्रॉस रोड (कॉमर्स कॉलेजजवळ), नवरंगपुरा, अहमदाबाद, (गुजरात)
फोन: ९९९८९ ४६२३१, ९७२५० ०५७९४ आणि ९६३८७ ५२०२०

***